ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 7 | MARCH - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# महिला सक्षमीकरण ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले : एक अलौकिक व्यक्तिमत्व (३जाने१८३१-१० मार्च १८९७)




**प्रा. डॉ. सौ. अरुणा रविंद्र वाघोले**
**इतिहास विभाग प्रमुख , सहयोगी प्राध्यापक**

## प्रास्ताविक :

भारतातील पहिल्या शिक्षिका स्त्रीमुक्ती चळवळीच्या पहिल्या नेत्या पददलितांच्या कैवारी आणि प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या म्हणून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्थान आढळ आहे

एका अशिक्षित स्त्रीने शिक्षण घेऊन शिक्षिका बनावे आणि वर्षानुवर्ष अज्ञानाच्या अंध:कारात चाचपडणाऱ्या स्त्री,शुद्रांना ज्ञानाचा प्रकाश दाखवावा ही गोष्ट भारताच्या २००० वर्षाच्या इतिहासात अपूर्व अशी आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रातून सामाजिक क्षेत्रात पदार्पण करावे, दुष्काळात अन्नानन्न करून तडफडणाऱ्या हजारो जीवांच्या मुखात घास भरवावा, शेतकरी- सामाजिक सुधारणांसाठी वाड:मयाचे साधन हाती घेऊन कवयित्री आणि लेखिका बनावे, सर्व गाव, सर्व समाज सुशिक्षित, सुसंस्कृत करण्याचे, जनावरांप्रमाणे जिणे जगणाऱ्या स्त्री, शूद्रांना माणसात आणण्याचे वेड घ्यावे, पतीच्या निधनानंतरही शोक करीत न बसता सत्यशोधक समाजाच्या तत्त्वप्रसाराचे कार्य करण्याचे सतीचे वाण घेऊन अविश्रांत काम करावे, दीन दलितांसाठी, दीनदलितांच्या मुलांसाठी, रोगाच्या साथीत दिवसा-रात्री घराबाहेर धावावे, त्यांची सेवा करावी, प्लेगच्या साथीत त्यांना कडेवर घेऊन आपल्या दत्तक मुलगा डॉ. यशवंत फुले यांच्या दवाखान्यात घेऊन जावे, तेथे प्लेगच्या रोगाला आपण बळी पडत असल्याची जाणीव होऊनही रुग्णांची सेवा करीत राहावी आणि ही सेवा करता अनंतात विलीन होऊन जावे, अशा व्यक्तिमत्वास केवळ अलौकिक हे एकच विशेषण योजिता येईल.

सावित्रीबाईचे व्यक्तिमत्व सामान्य नव्हते, एक समाज सुधारकांची पत्नी म्हणून त्यांचे एक सवंग अस्तित्व होते, असे नाही तर सावित्रीबाईंनी जोतीरावांना त्यांच्या ईहलोकातील आयुष्याच्या अखेरच्या प्रवासापर्यंत साथ दिली परंतु ही साथ केवळ एका पती परायण स्त्रीची नव्हती तर त्याची प्रेरणा स्वतंत्र अशी होती.

## सावित्री:

सावित्रीबाईंचा जन्म एका गरीब शेतकरी कुटुंबात झालेला. शिरवळ जवळच्या एका गावात जेथे सबंध गाव १००-१५० उंबरा सापडणे कठीण. गावाला वर्षानुवर्षे दुष्काळाची परंपरा लाभलेली. शिक्षणाचे संस्कार नाहीत. अशी ही निरक्षर कुटुंबात जन्मलेली वाढलेली स्त्री,जोतिरावांच्या हाताखाली शिक्षणाचे धडे गिरवते. शिक्षण - प्रशिक्षण घेते आणि ज्ञानदानाचे व्रत घेऊन ज्ञानयोगिनी बनते.

फुले दांपत्याने शाळा काढल्या. १८४८ ते १८५२ या चार वर्षांच्या कालावधीत पुणे आणि पुण्याच्या ग्रामीण परिसरात एकूण १८ शाळा काढल्या आणि त्या यशस्वीपणे चालवल्या. या शाळा चालविण्यासाठी त्यांनी अविश्रांत परिश्रम केले त्यांनी दिवस पाहिला नाही की, रात्र पाहिली नाही. तहानभूक विसरून या दांपत्याने या परोपकारी कृत्याचा पिच्छा न सोडता ज्ञानदानाचा यज्ञ अहोरात्र प्रज्वलित केला.

फुले दांपत्याचे हे कार्य म्हणजे यांनी घडवून आणलेला एक चमत्कार होता कारण १९ व्या शतकातील उत्तरार्धात अशा काळात शाळा चालवणे अशक्य कोटीतील गोष्टी होत्या. अशा या दांपत्याच्या जीवनाचा, त्यांच्या कार्याचा चिकित्सकपणे अभ्यास करणे फारफार

महत्त्वाचेआहे. त्यांचे कार्य, शिक्षण, पुस्तके, कविता, अस्पृश्यांसाठी कार्य, पत्रलेखन व शिवाय समाजाची अन्यायकारी वागणूक, शेतकरी, समाज, कुटुंब आणि देशासाठी केलेले कार्य एक शैक्षणिक क्षेत्रातील क्रांती बनली व भारताच्या जडणघडणीत एक अग्रगण्य दांपत्य ठरले आहे

## मनुष्यत्वासाठी दिशा :

"काव्यफुले" या काव्य ग्रंथात त्या म्हणतात,

"शूद्रांना सांगण्याजोगा शिक्षण मार्ग हा
शिक्षणाने मनुष्यत्व पशुत्व हाटते पहा"||[१]

मनुष्यत्वासाठी "शिक्षण" हा मूलभूत विचार १८४८ साली सांगणाऱ्या सावित्रीबाई फुले या भारतातील थोर शिक्षण तज्ञच होत्या. फुले दाम्पत्याने शाळा काढल्या, शाळांची जाळी विणीतते बसले नाहीत, समाज परिवर्तनासाठी शिक्षण हे साधन आहे. केवळ साक्षर करण्यासाठी त्यांना शिक्षण द्यावयाचे नव्हते तर, शिक्षणातून समाज जागृती करावयाची होती. जुनाट रुढी, परंपरा, जुन्या अंधश्रद्धा,भोळ्या समजूती नाहीशा करावयाच्या होत्या. सामान्य लोक पशुतुल्य जीवन जगत होते त्यांच्यात मनुष्यत्व कसे आणता येईल याचा विचार सावित्रीबाईंनी केला होता. तो विचार काव्यफुले याकाव्यग्रंथातून मांडला. यातून लोकांना माणूस बनविणे, ताठ मानेने उभे राहायला लोकांना शिकवणे, स्वत्व जपण्यास शिकविणे आणि त्याही पलीकडे माणसांबद्दल प्रेम निर्माण करण्यास शिकविणे एवढा शिक्षण विषयक व्यापक दृष्टिकोन या लोकोत्तर स्त्रीच्या ठिकाणी होता.इ.स.१८४८मध्ये सर्वप्रथम जोतिबांनी मुलींची शाळा काढली आणि महाराष्ट्रात सामाजिक क्रांतीची सुरुवात केली. या शाळेसाठी शिक्षिका हवी होती, म्हणून त्यांनी त्या काळात आपल्या पत्नीला सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षिका बनविले. या महान स्त्रीने प्रचलित रूढींविरुद्ध बंडपुकारून विद्यादानाचे पवित्र कार्य हाती घेतले.[२]तसेच प्रा. गं.बा सरदार म्हणतात चुल आणि मुल यात गुंतून न पडता घराचा उंबरठा ओलांडणारीव सामाजिक कार्यात भाग घेणारी महाराष्ट्रातील पहिली स्त्री सावित्रीबाई याच आहेत. महात्मा फुले यांनी १८५५ साली 'तृतीय रत्न' नावाचे नाटक लिहिले होते, त्यात परंपरा आणि अंधश्रद्धा यांनी जखडलेल्या निरक्षर कुटुंबाची धर्माच्या नावाखाली कशी लुबाडणूक व नागवणूक होते याचे प्रत्ययकारी चित्र यात फुल्यांनी रेखाटले होते. या नाटकात शेवटी सावित्रीबाईंनी प्रौढ स्त्रियांसाठी जी रात्रीची शाळा सुरू केली आहे, त्या शाळेत प्रौढ स्त्रियांनी जावे असा उपदेश केला आहे.महात्मा ज्योतिबा फुल्यांनी इ.स. १८५२ मध्ये अस्पृश्यांसाठी शाळेची स्थापना केली. नव्या पिढीतील अनेक सुशिक्षितांनी व इंग्रज सरकारी अधिकाऱ्यांनी शाळांची स्थापना करण्यातजोतिबांना बरीच मदत केली.इ.स. १८५३ मध्ये जोतिबा म्हणतात, महार, मांग, चांभार या देशात फार असून ते अगदी नीचावस्थेत आहेत, हे पाहून ईश्वराच्या प्रेरणेने माझ्या मनात अशी इच्छा उत्पन्न झाली की, अशास सुशिक्षित करण्याविषयी काहीतरी उपाययोजावा[३]हंटर कमिशन समोर साक्ष देणारे महाराष्ट्रातील महात्मा जोतिबा पहिलेच भारतातील मागणी करणारे पहिले सुधारक होते. सरकारने बहुजन समाजासाठी सार्वत्रिक सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी सोय करावी अशी मागणी जोतिबांनी इ.स.१८५२ च्या हंटर कमिशनसमोर केली होती. अशा सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची मागणी करणारे महात्मा जोतिबा पहिले सुधारक होते. त्या काळात शिक्षणाच्या सर्व सुविधा ब्राह्मण वर्ग घेतो आहे. हा वर्ग स्वयंकेंद्रित व स्वार्थी असल्याने शिक्षणाच्या झिरपण्याच्या सिद्धांतानुसार शिक्षण खालच्या थरापर्यंत कधीच पोहोचू शकणार नाही यासाठी दयाळू इंग्रज सरकारने अशा ब्राह्मण वर्गावर विसंबून न राहता शूद्र व अतिशुद्रांच्या शिक्षणावर आपले लक्ष केंद्रित करावे व त्यांच्या शिक्षणाची गोडी उत्पन्न करावी अशी मागणी जोतिबांनी सरकारकडे केली होती.[४]बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्त्व कळत नसल्याने सरकारने कोणती उपाययोजना करावी याबाबत महात्मा फुले म्हणतात, सर्व अज्ञानी शेतकऱ्यांसह कारागिरांनीआपापली मुले त्यांच्या शाळेत हट्टाने जर पाठविली नाहीत, तर सरकारने आपल्या हेकट लोकांची मुले- मुली शाळेत शिकविण्याविषयी बेलाशक सक्तीचा कायदा करावा आणि सरकारी सत्यपालकांकडून त्या सर्व लोकास असा बोध करावा की, तुम्ही आपली मुले जर आपापल्या शाळेत पाठविले नाहीत, तर ती आळसामुळे उनाड होतील आणि आपली पोटे जाळण्याकरता चोऱ्या करतील[५]

समाजातील रूढी, परंपरा आणि अज्ञान यांचे उच्चाटन करण्यासाठी या दांपत्याने आपले जीवन सर्वस्वऐन तारुण्यात कसे समर्पित केले होते, याची कल्पना या नाटकातून येते. जसे शिक्षणाचे कार्य केले तसेच समाजकार्यही केले दुष्काळाच्या काळात या दांपत्याने अन्नछत्रे उघडली आणि हजारो जीवांचे प्राण वाचवले.

**जीवदानाचे कार्य :**

जिवंतपणे मरणाचे भोग भोगणाऱ्या जीवांनाही त्यांनी नवजीवन दिले त्या काळी विधवा स्त्रियांची स्थिती अत्यंत अनुकंपनीय होती. अकाली वैधव्य आलेल्या तरुण विधवा स्त्रिया घराच्या सांदी- कोपऱ्यात फुटक्या कपाळाला दोष देत, उभे जळते आयुष्य अश्रू ढाळत मनाची आणि शरीराची भडकलेली आग विझवू पाहत. त्या काळात विधवांची स्थिती भयानक होती. हे तत्कालीन आकडेवारीवरून लक्षात येईल.

सन १८९१ च्या खानेसुमारीनुसार महाराष्ट्रात केवळ ० ते ४ वर्षे वयाच्या विधवा झालेल्या, आईचे स्तनपानही न सुटलेल्या शैशवावस्थेतील निरागस कोमल बालिकांची संख्या १३८७८ अशी होती.[६]धर्माच्या नावाखाली रुढी, परंपरा यांनी स्त्रियांचे भावविश्वच उध्वस्त करून टाकले होते. स्त्री जीवनावर वर्षांनुवर्षे मनूचा अंमल चालला होता. स्त्रिया मग त्या उच्च कुलीत ब्राह्मण स्त्रिया असो किंवा शूद्रातिशूद्र स्त्रिया असोत या ठिकाणी मनुने उच्चनीच अशी विषमता निर्माण केली नव्हती.

समाजात बालविवाह, बालजरठविवाह या चाली सर्रास रूढ होत्या. त्या काळातचहुंडा देऊ न शकणारा एखादा आगतिक बाप आपल्या सात- आठ वर्षाच्या कोवळया मुलीस६०-७० वर्षाच्या एखाद्या वृद्धाच्या गळयात बांधून मोकळा होई, तेव्हा-

"का हो अण्णा मी तुमची लाडकी<br>का करिता मला बोडकी"[७]

अशा पोटच्या मुलीने फोडलेला टाहो त्या जन्मदात्या पित्यास ऐकू जात नसे.

लेकीचा जन्म। घालून चुकला॥<br>बैल घाण्याला जुंपला।जन्मवैरी॥<br>लेकीचा जन्म। नको देऊ सख्याहरी॥[८]

त्या काळात लेक जन्माला येणे हे दुःख, पाप, खर्चाची बाब म्हणून पाहिले जाई.

**ब्राह्मण सुधारकांची अगतिकता :**

समाजात केशवपनासारखी दुष्ट रूढी उच्चवर्णीय स्त्रियांमध्ये होती. ही अन्यायकारक रूढी नष्ट व्हावी, अशी आच(धाहकता) ब्राह्मण समाजालाही होतीच. त्यासाठी ब्राह्मण सुधारकांनीही प्रयत्न केलेहोते, परंतु त्यांना सुधारकांना अंगभूत, परंपरानिष्ठ मर्यादा पडल्या होत्या. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी पहिली पत्नी वारल्यानंतर विधवेशी विवाह केल्यास वडिलांना अपार दुःख होईल म्हणून अकरा वर्षे वयाच्या बालिकेशी लग्न केले.[९]त्याच पुढे सेवासदनाच्या संस्थापिका झाल्या, रमाबाई रानडे. सासुरवाशीण मुलीला सासूचा जाच होईल म्हणून लोकहितवादींनी बिनबोभाट प्रायश्चित घेतले.[१०]

भारतीय राजकारणात लोकमान्य टिळकांची प्रतिमा विलक्षण दीप्तीने झळकली, परंतु विचारात ठामपणा असणाऱ्या या नेत्याने चहा- ग्रामण्य प्रकरणात कच खाल्ली. प्रसंगी पाऊल मागे घेतले होते.

त्या काळातही पुनर्विवाहाबाबत रानडेंनी दाखवलेली अगतिकता, शुद्धीकरणाच्या प्रश्नावरून लोकहितवादींनी सनातन्यांपुढे घातलेले लोटांगण. पहिली पत्नी जिवंत असता गोखल्यांनी केलेला दुसरा विवाह या सर्व पार्श्वभूमीवर जोतिरावांची आणि सावित्रीबाईंची तत्त्वनिष्ठा उजळून निघणे यात शंकाच नाही.

"घेतले ते ब्रीद आम्ही। मागे कधीच हटणार नाही।<br>येता कितीही संकटे। आम्ही तसुभरही डगमगणार नाही॥

"जोतिराव व सावित्रीबाई या दाम्पत्याने आपल्या चुलबोळक्यांचा संसार न मांडता दीनदुबळयांचे संसार थाटण्यासाठी, स्त्री-शूद्रांच्यासेवेच्या यज्ञकुंडात आपली आहुती दिली."[११]

हे दाम्पत्य काशीबाईसारख्या पतित विधवांसाठी अनाथाश्रम आणि बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन करून पतितोद्धार करीत होते. पतित स्त्रिया अनौरस अपत्यास आपले अपत्य मानून त्यास कायदेशीररित्या दत्तक घेऊन त्याचे पालन पोषण करीत होते. त्याला वैद्यकीय शिक्षण देऊन स्वावलंबी करीत होते. आपल्या मालमिळकतीचा मालक म्हणून तो जाणता व सज्ञान झाल्यावर त्याजला केवळ तशी वहिवाट मात्र करून त्याने आपले वंशपरंपरेने सुखरूप उपभोग घेऊन मालकी करावी. आपले मालमिळकतीवर आमचे भाऊबंद व पुतण्या गणपतराव राजाराम फुले वगैरे हर कोणाची मालकी अथवा वारस अथवा दावा नाही व माझे मिळकतीवर कोणतेही प्रकारचा

बिलकुल कोणाचा हक्क नाही"[१२] असे मृत्युपत्र तयार करीत होते. त्याच काळात आणि त्याच पार्श्वभूमीवर उच्चवर्णीय सुधारक स्त्रियांनी जाकिटे घालावीत की न घालावीत असे सोज्वळ लेख लिहिण्यात किंवा स्त्रियांना आपल्या शिक्षण संस्थेत प्रवेश देताना स्वजातीची लक्ष्मण रेखा आखून देण्यात धन्यता मानीत होते.[१३]

१८९० साली महात्मा फुले यांचे निधन झाल्यावर सावित्रीबाईंनी त्यांच्याच पश्चात सत्यशोधक समाजाची धुरा समर्थपणे पाहिली. चूल आणि मूल ही पारंपारिक विचारसरणी झटकून ही स्त्री सार्वजनिक कार्यासाठी बाहेर पडली. असे कार्य करणारी १९व्या शतकातील सावित्रीबाई फुले ही महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील पहिली स्त्री

त्याकाळी उच्चवर्णीय सुशिक्षित स्त्रियांना नव्हत्या असे नाही, परंतु त्यांच्या समाज जागृतीच्या कार्यालाही पारंपारिक मर्यादा होत्या.हळदी कुंकवाचे सामुदायिक समारंभ साजरे करण्यापलीकडे त्यांच्या सुधारणा उंबरठा ओलांडून पुढे गेल्या नाहीत माजघर आणि दिवाणखाना यातच त्या रेंगाळत राहिल्या.[१४]

सामाजिक सुधारणांचा हिरीरीने पुरस्कार करणारे आणि स्वतः ब्राह्मण असून ब्राह्मणांना शिव्या देऊन त्यांना आत्मपरीक्षण करावयास उद्युक्त करणारे लोकहितवादी १८९२ साली निधन पावले. सासवड येथे सत्यशोधक समाजाच्या सभेत त्यांना श्रद्धांजली वाहिली गेली. या थोर समाजसुधारकाच्या कार्याचे मूल्यमापन करताना सावित्रीबाई यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात परखडपणे म्हणतात,"आपल्या जातीचे दोष काढून टाकण्याचा त्यांनी (सरदार गोपाळराव हरी देशमुख) सदुपदेश केला. परंतु तत्कालीन ब्राह्मणांना जोतिबांची चळवळ समजून घेण्याची जशी पात्रता नव्हती, तशी देशमुखांचे बोलणे ऐकून घेण्याची अक्कल नव्हती.[१५]"स्त्रियांच्या शाळेत स्त्री शिक्षिका हवी म्हणून बरोबरीच्या वागण्याच्या दृष्टीनेच सावित्रीबाईंनी शिक्षण देऊन घरापासूनच स्त्रीशिक्षणाचाश्रीगणेशा केला होता. सावित्रीबाईंवर शाळा सोपवून जोतीरावांनी समाजाला आदर्श घालून दिला. सावित्रीबाईंच्या शाळेतील पहिल्या विद्यार्थिनी १) अन्नपूर्णा जोशी २) सुमती मोकाशी ३) दुर्गा देशमुख ४) माधवी थत्ते ५) सोनू पवार ६) जानीकर्डिले यावेळी चार ब्राह्मण, एक धनगर, एक मराठा अशी संख्या होती. तसेच निर्भीडपणा, निर्भयता, अंगीकृत कार्यावरील अविचल निष्ठा, विचलनिष्ठा आणि त्यासाठी समाजाकडून अपमान, छळ सोसण्याची जिद्द हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील गुण असाधारण होते. त्यांचा आपल्या कार्यावरील आत्मविश्वास असामान्य होता. याबाबत महात्मा फुल्यांपेक्षा सरसच होत्या. सावित्रीबाईंनी जोतिरावांपासून प्रेरणा घेतली हे खरेच.[१६]

१६ नोव्हेंबर १८५२ ला सरकारने जोतिराव आणि सावित्रीबाईंचा गौरव केला.१८५२ साली हा योग घडवून आला. विश्रामबाग वाड्यात दरबार भरला. प्रमुख पाहुणे मुंबईचे गव्हर्नर, मोठमोठे अधिकारी,जोतिबांचे मित्र, गावातील ठळक मंडळी व चाहते यांनी वाडा भरून गेला. लोकांनी कौतुक केले. सरकारने बक्षीस दिले. कोणते बक्षीस?जोतिबास दोनशे रुपये किमतीची शाल व सावित्रीबाईंना चोळी लुगडे शिवाय शाळेला दरमहा ७५ रुपये देणगी. त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना सावित्रीबाई म्हणाल्या,"बंधू-भगिनींनो आपल्या समाजातील स्त्रिया व शूद्रातिशुद्र यांची संख्या फार मोठी आहे व या साऱ्या समाजाला आजवर शिक्षणापासून दूर ठेवण्यात आले. या लोकांच्या घरात ज्ञानगंगा पोहोचवावी या उद्देशाने मी काम सुरू केले. व्याप सांभाळणारे इंग्रजी शाळेतील शिक्षक तसेच माई व फातिमा शेख यांचा देखील गौरव आहे.

## काळापुढे धावणारी स्त्री–सावित्री :

जोतिरावांचे निधन १८९० साली झाले. निधन समयी अंत्ययात्रेच्या वेळी जोतिरावांचे भाऊबंद, समस्त फुले मंडळी आडवी आली. दत्तक पुत्र यशवंत हे कडू बेणे! त्याला प्रेतयात्रेपुढे टिटवे (मर्तिकाचे मडके) धरू देण्यास फुले मंडळींनी एकजात विरोध केला. त्याप्रसंगी सावित्रीबाईंच्या धैर्याचा कस लागला. उरावर धोंडा ठेवून सावित्रीबाईंनी पुरुषाच्या हिमतीने प्रेतयात्रेपुढे टिटवे धरले. बाईच्या एका बाजूस यशवंत दुसऱ्या बाजूस गजानन (जोतिरावांचा भाऊ) अशी अंत्ययात्रा स्मशानभूमीवर पोहोचली.[१७]

## समारोप :

१८५० ते १८९०या कालखंडात सुधारणांचा जोरच अंधश्रद्धा, रुढीपरंपरांच्या, काटया-कुपाटयांच्या,खाचखळग्यांच्या, डोंगरकपाऱ्यांच्या मार्गावरून धावत होता. त्या कृतीनिष्ठ सुधारणा रथाचे एक चक्र होते, महात्मा जोतिराव फुले तर दुसरी चक्र होते, सावित्रीबाई जोतिराव फुले. तेव्हा त्या काळातही जातीभेद मानला नाही. आज समाजात ज्या वेगवेगळ्या क्षेत्रात शिक्षिका, बँक मॅनेजर, अंतराळवीर, खेळाडू, खासदार, आमदार या सर्वच क्षेत्रात महिलांनी आपली उंची गाठली आहे ते म्हणजे पायाभूत सुविधा, शिक्षणाचा

पाया सावित्रीबाई फुले यांनी घालून दिला म्हणूनच सर्व क्षेत्रातनिर्भयपणे महिला उच्च शिक्षण घेऊन कार्य करत आहे तेजस्वी भूमिका दमदारपणे करत आहेत.[१८]

या सावित्रीबाईंच्या आदर्श व्यक्तिमत्वातून एक मोलाचा संदेश घेणे आवश्यक आहे, स्त्री पुरुष समानता आली तरी प्रत्येकाची कर्तव्ये ही वेगवेगळीच आहेत, ती पार पाडणे, निर्णय क्षमता विकसित करणे, आत्मकेंद्री न होता, समाज, देश, कुटुंबाचाही विचार केला पाहिजे. संस्कार, संयम, आत्मनिर्भरता, निर्णय क्षमता. पक्वता या मूल्यांचा विकास व प्रसार व प्रचार गांभीर्याने व्हावा हीच खरी सभ्यता ठरेल.

**संदर्भ ग्रंथ व तळटीपा :**


१) सावित्रीबाई फुले - समग्र वाङ्:मय: (संपा) – ले.मा. गो. माळी प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई द्वितीयावृत्ती- मार्च १९९८, पृ. क्र.१०.
२) आधुनिक भारत : ले. डॉ. एन. एस. तांबोळी, प्रकाशक-निरालीपब्लिकेशन्स, पुणे. आवृत्ती चौथी. जुलै २०१८ पृ. क्र.३.२
३) आधुनिक भारत : ले. डॉ.एन. एस. तांबोळी, कित्ता पृ. क्र. ३.१२
४) आधुनिक भारत : ले. डॉ.एन. एस. तांबोळी, कित्ता पृ. क्र. ३.१२
५) आधुनिक भारत : ले. डॉ.एन. एस. तांबोळी, कित्ता पृ. क्र. ३.१२
६) सावित्रीबाई फुले समग्र वाङ्:मय–कित्ता पृ. क्र. ११
७) सावित्रीबाई फुले समग्र वाङ्:मय–कित्ता पृ.क्र. १२
८) सावित्रीबाई फुले समग्र वाङ्:मय- कित्ता पृ. क्र. १२
९) सावित्रीबाई फुले समग्र वाङ्:मय- कित्ता पृ. क्र. १२
१०) सावित्रीबाई फुले समग्र वाङ्:मय- कित्ता पृ. क्र. १२
११) सावित्रीबाई फुले समग्र वाङ्:मय–कित्ता पृ.क्र.१२
१२) धनंजय कीर, स. गं. माल्शे (संपा) महात्मा फुले समग्र वाङ्:मयदुसरी आवृत्ती, १९८०. महात्मा फुले यांचे मृत्युपत्र ४४,सावित्रीबाई फुले- समग्र वाङ्:मयपृष्ठ क्र.१३
१३) सावित्रीबाई फुले समग्र वाङ्:मय–कित्ता पृ. क्र.१०
१४) सावित्रीबाई फुले समग्र वाङ्:मय- कित्तापृ. क्र.१३
१५) १९ व्या शतकातील सामाजिक व राजकीय जीवन : ले. डॉ. सौ. अरुणा रविंद्र वाघोले, संयम प्रकाशन / पब्लिकेशन्स. १ ली आवृत्ती २६ जानेवारी २०२३. पृ. क्र. ३७
१६) सावित्रीबाई फुले समग्र वाङ्:मय–कित्ता पृ. क्र.१४
१७) सावित्रीबाई फुले समग्र वाङ्:मय- कित्ता पृ. क्र.१३
१८) १९ व्या शतकातील सामाजिक व राजकीय जीवन- कित्ता पृ. क्र. ३७